**विशेष दिवाणी दावा क्र. २६/२०१४ मधील नि.९५ खालील आदेश**
**मे.रतन मेटल्स तर्फे प्रोप्रा. वि. मे.यश एंटरप्रायझेस तर्फे प्रोप्रा.**
**CNR NO. MHST050002252014**

वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ११४ अन्वये दाखल केला आहे.

०२. सदरचा दावा वादीने रक्कम वसुलीकरीता दाखल केला आहे. सदरचे प्रकरण प्रतिवादीचे पुराव्याकरीता आहे. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी त्यांचे शपथपत्र न देता त्यांचेतर्फे वटमुखत्यार नेमून त्याचे शपथपत्र दाखल केले आहे. वादी यांचे म्हणणेप्रमाणे त्यांचेतील व्यवहार हे वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान झालेले होते. संपूर्ण व्यवहाराची माहिती ही प्रतिवादी क्र.१ व २ यांनाच आहे. दाव्याचे समन्स गेलेनंतर प्रतिवादी क्र.१ व २ हे दाव्याचे कामी स्वत: हजर झालेले आहेत. तसेच दावा दाखल करण्यापूर्वी वादीने पाठविलेल्या नोटीसींना उत्तरही प्रतिवादीतर्फेच देण्यात आले होते. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र.१ व २ यांनीच त्यांचे शपथपत्र दाखल करणे गरजेचे आहे. कायद्याप्रमाणे वटमुखत्यार हा त्याने केलेल्या कामासंदर्भातच साक्ष देवू शकतो. प्रतिवादी यांनी केलेल्या व्यवहारासंदर्भात वटमुखत्यार हा त्यांच्या वतीने साक्ष देवू शकत नाही. त्यामुळे वादीतर्फे वटमुखत्यार याचे शपथपत्र नि.८१ वर जे दाखल केलेले आहे ते रद्द होणेकरीता अर्ज दिलेला होता. सदरचा अर्ज न्यायालयाने नामंजूर केलेला आहे. वादीचे असे कथन आहे की, नि.८१ च्या आदेशाच्या वेळी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या **जानकी भोजवानी** या न्यायनिर्णयाचा विचार करण्यात आलेला नाही. त्यामुळे त्या आदेशाचे पुनर्विलोकन होणेकरीता सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

०३. सदर अर्जास प्रतिवादीतर्फे नि.९७ ला म्हणणे दाखल करण्यात आले आहे.

प्रतिवादींचे असे म्हणणे आहे की, नि.८१ वरील अर्ज गुणदोषावर निकाली निघाल्यामुळे सदरचा अर्ज कायद्याने चालण्यास पात्र नाही. वादी यांनी सदरचे प्रकरण लांबविण्याकरीता जाणूनबुजून सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती करण्यात आली आहे.

०४. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन करण्यात आले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

०५. सदर प्रकरण प्रतिवादीच्या पुराव्याकरीता आहे. प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, वटमुखत्यार हे त्यांच्या कंपनीतील अकाऊंट हेड असल्यामुळे त्यास संपूर्ण व्यवहाराची माहिती आहे. प्रतिवादी क्र.२ हे पोटापाण्याच्या उद्योगानिमित्त अत्यंत व्यस्त असतात व प्रतिवादी क्र.१ ही सतत आजारी असते. त्यामुळे त्यांना न्यायालयात चौकशीकामी हजर राहणे शक्य नाही. वटमुखत्यार हे त्यांच्या कंपनीतील कर्मचारी असून वादी प्रतिवादी यांच्या आर्थिक व्यवहाराबाबत त्यांना संपूर्ण माहिती असल्यामुळे त्यांचे शपथपत्र नि.८१ वर दाखल आहे.

०६. जानकी भोजवानी या न्यायनिर्णयामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने असे सांगितले आहे की, वटमुखत्यार हा त्याला माहित असलेल्या वैयक्तीक बाबींकरीताच एक साक्षीदार म्हणून साक्ष देवू शकतो. तसेच वटमुखत्यार म्हणून त्याने जे काम केले आहे त्यासंदर्भात एक साक्षीदार म्हणून साक्ष देवू शकतो. त्याने जे काम केले नाही त्या कामासंदर्भात तो वटमुखत्यार म्हणून इतरांच्या वतीने साक्ष देवू शकत नाही.

०७. वरील न्यायनिर्णय विचारात घेता सदर प्रकरणात वटमुखत्यार हा एक साक्षीदार

म्हणून त्याची साक्ष नोंदवू शकतो. तो प्रतिवादीतर्फे वटमुखत्यार म्हणून प्रतिवादीकरीता साक्ष नोंदवू शकत नाही. वादी यांनी वटमुखत्यार याचा सरतपास रद्द करण्याकरीता अर्ज दिलेला आहे. परंतु कायद्यामध्ये सरतपास रद्द करण्याची कोणतीही तरतूद नाही. त्यामुळे नि.८१ वरील सरतपास रद्द करता येणार नाही. नि.८१ वरील सरतपास हा एका साक्षीदाराचा सरतपास म्हणून ग्राहय धरता येईल. परंतु नि.८१ वरील सरतपास प्रतिवादीकरीता आहे असे ग्राहय धरता येणार नाही. त्यामुळे सदरचा अर्ज अंशत: मंजूर करणे न्यायोचित होईल. उपरोक्त कारणास्तव मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आ दे श

(१) अर्ज अंशत: मंजूर करण्यात येत आहे.

(२) नि.८१ वरील सरतपास हा प्रतिवादीकरीता ग्राहय धरण्यात येणार नाही.

JYOTI JAGNNATH MANE

Digitally signed by JYOTI JAGNNATH MANE
Date: 2025.07.05 11:16:35 +0530

ठिकाणः कराड ( जे.जे.माने )

दिनांकः ०४.०७.२०२५ ४ थे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, कराड.